महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४६५, ४४२, ४४३
ई-मेल-desk2@dte.maharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dte.maharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२३/ ७७४ दिनांक : 1 SEP 2023

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम / पाळी बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ : १) संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/वि.सं.ब./२०२३/६१०, दि.११.०७.२०२३
२) संचालनालयाचे पत्र क्र.२/एनजीसी/वि.सं.ब./२०२३/६११, दि.११.०७.२०२३
३) संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/वि.सं.ब./२०२३/६८३, दि.०१.०८.२०२३
४) संचालनालयाचे पत्र क्र.२/एनजीसी/वि.सं.ब./२०२३/६८४, दि.०१.०८.२०२३

विषयांकीत संदर्भीन परिपत्रक तथा पत्र पहावित.

संदर्भीय क्र. १ च्या परिपत्रकान्वये विद्यार्थ्यांना संस्था / शाखा बदलास अर्ज करण्यासाठीचा शेवटचा दि.१८.०७.२०२३ ठेवण्यात आलेला होता. तद्नंतर विद्यार्थी संस्था बदलासाठी अर्ज करण्यास व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाकरीता दि.०५.०८.२०२३ व या व्यतिरीक्त अभ्यासक्रमांकरीता दि.३१.०८.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. दरम्यान विद्यार्थी, पालक व संबंधित घटकांकडून संस्था बदलासाठी अर्ज करण्याच्या मुदतवाढीबाबत विचारणा होत आहे. करीता शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया समाप्त झाल्यानंतर रिक्त असलेल्या जागांवर [लॅटरल १०% व अधिसंख्या जागांव्यतीरीक्त [Excluding Lateral Entray seat and Supernumerary seats) विद्यार्थ्यी हिताचा विचार करून शेवटची संधी म्हणून विद्यार्थी संस्था बदलाबाबत खालील प्रमाणे संस्था, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाच्या स्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी.

१. संस्था प्रमुखांनी संस्थेंतर्गत विद्यार्थ्यांच्या शाखा बदलाची कार्यवाही दि. २२.०९.२०२३ पर्यंत करण्यात यावी.

२. विभागांतर्गत संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल / विद्यापीठ बदलासह संस्था व शाखा बदलाची कार्यवाही दि. ३०.०९.२०२३ पर्यंत सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांनी त्यांचे स्तरावरुन पुर्ण करावी.

३. आंतरविभागीय संस्था बदलाचा प्रस्ताव सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांनी तंत्र शिक्षण संचालनालयास दि. २७.०९.२०२३ पर्यंत त्यांचे शिफारशीसह प्रस्तावित करावा.

विद्यार्थी संस्था बदलासाठीच्या मुदतवाढीस अनुसरून विषयांकीत प्रकरणी संस्था व आपले स्तरावरुन कार्यवाही करण्यासाठीची कालमर्यादा निश्चित केली आहे. तरी, प्रस्तूत प्रकरणी वरीलप्रमाणे नमूद केलेल्या कालमर्यादेत कार्यवाही करण्यात यावी. सदर कार्यवाही करतांना विभागीय कार्यालय स्तरावरुन व संबंधित संस्थांचे प्राचार्य यांनी नियमांचे काटेकोर पालन करावे. तरी, आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थाना सदरची माहीती आपले स्तरारुन अग्रेषित करावी. तसेच संस्था प्रमुखांना संस्था बदलाच्या वाढीव मुदतीबाबतची माहिती विद्यार्थ्यांना अवगत करण्यास व सदर माहिती संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करण्यास कळविण्यात यावे.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक, तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, माहितीसाठी सादर

१. मा. सचिव, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी पदवी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
   त्यांना कळविण्यात येते की, सदर माहिती संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करून पुढील उचित कार्यवाही कालमर्यादेत करण्यात यावी.
२. मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)
३. प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,वास्तुशास्त्र, एचएमसीटी इ. पदवी महाविद्यालये,महाराष्ट्र राज्य (संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे मार्फत)
४. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई
५. कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस.